गुणवंत मुलामुलींना परदेशात उच्च शिक्षणासाठी शिष्यवृत्ती मंजूर करणेबाबत - स्पष्टीकरणात्मक सूचना.

महाराष्ट्र शासन
उच्च व तंत्र शिक्षण विभाग,
शासन परिपत्रक क्रमांक : संकीर्ण-२०१८/प्र.क्र.२१८/२/तांशि-४
मंत्रालय विस्तार भवन, मादाम कामा मार्ग,
हुतात्मा राजगुरु चौक, मुंबई-४०००३२.
दिनांक: ११ फेब्रुवारी, २०१९

वाचा : १) शासन निर्णय, उच्च व तंत्र शिक्षण विभाग, क्रमांक : संकीर्ण-२०१८/प्र.क्र.२१८/तांशि-४, दिनांक ४ ऑक्टोबर,२०१८
२) शासन परिपत्रक, उच्च व तंत्र शिक्षण विभाग, क्रमांक : संकीर्ण-२०१८/प्र.क्र.२१८/तांशि-४, दिनांक १२ नोव्हेंबर,२०१८
३)संचालक, तंत्र शिक्षण यांचे पत्र क्रमांक १९/डीटीई/परदेशी शिष्यवृत्ती/२०१९/१६, दिनांक ३१ जानेवारी,२०१९

प्रस्तावना :-

"गुणवंत मुलामुलींना परदेशात उच्च शिक्षणासाठी शिष्यवृत्ती मंजूर करणे" ही योजना संदर्भाधिन दिनांक ४ ऑक्टोबर,२०१८ च्या शासन निर्णयान्वये शैक्षणिक वर्ष २०१८-१९ पासून लागू करण्यात आली आहे. या योजनेच्या अंमलबजावणीसाठी काही मुद्दयांबाबत स्पष्टता येणे आवश्यक होते. याकरीता संचालक, तंत्र शिक्षण यांनी संदर्भाधिन दिनांक ३१ जानेवारी,२०१९ च्या पत्राव्दारे शासनास प्रस्ताव सादर केला होता.

शासन परिपत्रक : -

"गुणवंत मुलामुलींना परदेशात उच्च शिक्षणासाठी शिष्यवृत्ती मंजूर करणे" या योजनेंतर्गत उपस्थित होणा-या मुद्दयांच्या अनुषंगाने खालीलप्रमाणे कार्यवाही करण्याचे सूचित करण्यात येत आहे :-

| मुद्दा क्र. | मुद्दा | प्रस्तावित कार्यवाही |
|---|---|---|
| १ | शासन निर्णया सोबतचे परिशिष्ट-ब<br>१. सर्वसाधारण अटी व शर्ती मधील अनुक्रमांक २. विद्यार्थ्याला परदेशातील THE / QS अद्ययावत वर्ल्ड रॅन्कींगमध्ये २०० च्या आत असलेल्या शैक्षणिक संस्था/ विद्यापीठामध्ये गुणवत्तेनुसार प्रवेश मिळालेला असावा अशी तरतूद आहे. मिळालेला | शासन निर्णयातील तरतुदीनुसार THE किंवा QS रॅन्कींगपैकी कोणत्याही एका रॅन्कींग मध्ये २०० पर्यंत रॅन्कींग असलेल्या परदेशातील शैक्षणिक संस्था/ विद्यापीठामध्ये प्रवेश मिळाला असेल तर अश्या उमेदवारास अर्ज करण्यास पात्र करण्यात आले आहे व त्यांचे |

P. file
राठोड मॅडम
07/03

<table>
<tr>
<td></td>
<td>असावा अशी तरतूद आहे.<br><br>QS रॅन्कींग च्या संकेतस्थळावर २०० च्या पुढील ५०० रॅन्कींग पर्यंत क्रमशः उपलब्ध करून दिल्या आहेत. त्यापुढे ५०१ ते ५१० याप्रमाणे १० च्या गटात ६०० पर्यंत, ६०१ ते ६५० याप्रमाणे ५० च्या गटात ८०० पर्यंत व त्यापुढे ८०१ ते १००० पर्यंतच्या २०० च्या गटात देण्यात आलेल्या आहेत.<br><br>THE रॅन्कींग च्या संकेतस्थळावर मात्र २०० च्या पुढील रॅन्कींग क्रमशः न देता २०१ ते २५० या प्रमाणे ५० च्या गटात ४०० पर्यंत, ४०१ ते ५०० या प्रमाणे १०० च्या गटात ६०० पर्यंत व त्यापुढे ६०१ ते ८०० पर्यंतच्या २०० च्या गटात १००० पर्यंत देण्यात आलेल्या आहेत.<br><br>त्यामुळे २०० च्या पुढील रँकींग बाबतची रँकींग विचारात घेण्यासाठीची कार्यपध्दती काय असावी?</td>
<td>अर्ज स्वीकारण्यात आले आहेत.<br><br>QS वर्ल्ड रॅन्कींग व THE रॅन्कींग च्या संकेतस्थळावर २०० च्या पुढील रॅन्कींग क्रमशः उपलब्ध नाहीत व ते गट स्वरुपात दर्शविण्यात आलेले आहेत.<br><br>२०० च्या पुढील रॅन्कींग शासन निर्णयाच्या तरतुदीच्या बाहेर असल्याने २०० च्या पुढील रॅन्कींगबाबत निश्चित रॅन्कींग उपलब्ध नसल्यास, रॅन्कींग नमूद करतांना त्या संस्था/विद्यापीठाचे रॅन्कींग ज्या गटात असेल त्या गटातील कमी क्रमवारी असलेल्या रॅन्कींगचा अंक विचारात घेण्यात यावा. उदा. २०१ ते २५० या गटात संस्था/विद्यापीठ असेल तर कमी क्रमवारी म्हणून २५० रॅन्कींग चा अंक विचारात घेण्यात यावा.</td>
</tr>
<tr>
<td>२</td>
<td>शासन निर्णया सोबतचे परिशिष्ट-ब<br><br>११. गुणवत्ता यादी व निवड यादी तयार करण्याची कार्यपद्धती नुसार गुणवत्ता यादी तयार करताना गुणांचे मुल्यांकन करतांना THE and QS World Ranking Average करिता खालील प्रमाणे तरतूद आहे<br>
<table>
<tr><th>अ.क्र.</th><th>उत्तीर्ण केलेला अभ्यासक्रम</th><th>प्राप्त केलेले गुण</th><th>गुणांचे मुल्यांकन</th></tr>
<tr><td>४</td><td>THE and QS World Ranking Average</td><td>१ ते ५०</td><td>५०</td></tr>
<tr><td></td><td></td><td>५१ ते १००</td><td>४०</td></tr>
<tr><td></td><td></td><td>१०१ ते १५०</td><td>३०</td></tr>
<tr><td></td><td></td><td>१५१ ते २००</td><td>२०</td></tr>
</table>
THE and QS World Ranking Average ची गणना ५० ते ५१, १०० ते १०१, १५० ते १५१ या दरम्यान आल्यास मुल्यमापन करण्याबाबतची कार्यपध्दती</td>
<td>शासन निर्णयातील तरतुदीनुसार THE and QS World Ranking Average ची गणना ५० ते ५१, १०० ते १०१ , १५० ते १५१ या दरम्यान आल्यास तिचे मूल्यमापन करताना सरासरीचा अपुर्णांक ०.५ असा येणार आहे त्यामुळे त्यास वरच्या अंकात ग्राह्य धरून ५०.५ असल्यास ५१, १००.५ असल्यास १०१, १५०.५ असल्यास १५१, २००.५ असल्यास २०१ असे ग्राह्य धरण्यात येईल. व त्यानुसार गुणांचे मुल्यांकन करण्यात येईल.</td>
</tr>
</table>

| | | |
|---|---|---|
| ३ | शासन निर्णया सोबतचे परिशिष्ट-ब<br>११. गुणवत्ता यादी व निवड यादी तयार करण्याची कार्यपद्धती मधील अनुक्रमांक ३ अ) नुसार गुणवत्ता यादी तयार करतांना समसमान (Tie) गुणवत्ता असलेल्या प्रकरणी THE/QS World Ranking जेष्ठताक्रम असलेल्या विद्यार्थ्यास गुणवत्ता यादीत वरचे स्थान देण्यात यावे अशी तरतूद आहे. THE/QS World Ranking पैकी कोणत्या Ranking चा आधी विचार व्हावा हे स्पष्ट होत नाही. | गुणवत्ता यादी व निवड यादी तयार करण्याची कार्यपद्धती नुसार गुणवत्ता यादी तयार करताना गुणांचे मुल्यांकन करतांना THE and QS World Ranking Average च्या आधारे मुल्यांकन करण्याची तरतूद आहे त्याच अनुषंगाने THE किंवा QS World Ranking या पैकी कोणत्याही एका Ranking ला प्राधान्य न देता THE and QS World Ranking Average च्या जेष्ठताक्रमा चा विचार करून त्या आधारे विद्यार्थ्यास गुणवत्ता यादीत वरचे स्थान देण्यात यावे.<br>गुणवत्ता यादी तयार करतांना समसमान (Tie) गुणवत्ता असलेल्या प्रकरणी THE and QS World Ranking Average जेष्ठताक्रम असलेल्या विद्यार्थ्यास गुणवत्ता यादीत वरचे स्थान देताना अपुर्णांकाचा विचार करण्यात यावा. |
| ४ | शासन निर्णयातील तरतुदीनुसार THE किंवा QS रॅन्कींगपैकी कोणत्याही एका रॅन्कींग मध्ये २०० पर्यंत रॅन्कींग असलेल्या परदेशातील शैक्षणिक संस्था/ विद्यापीठामध्ये प्रवेश मिळाला असेल तर अश्या उमेदवारास अर्ज करण्यास पात्र करण्यात आले आहे मात्र THE and QS World Ranking Average ची संख्या २०० च्या पुढे असल्यास गुणांचे मुल्यांकन कसे करावे ? | THE and QS World Ranking Average ची संख्या २०० च्या पुढे असल्यास गुणांचे मुल्यांकन शुन्य "०"करावे. |

२. संचालक, तंत्र शिक्षण यांनी या अनुषंगाने पुढील आवश्यक ती कार्यवाही करावी.

महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नांवाने,

( संजय औ. धारुरकर )
अवर सचिव, महाराष्ट्र शासन

प्रति,

१. संचालक, तंत्र शिक्षण, महाराष्ट्र राज्य, मुंबई
२. संचालक, उच्च शिक्षण, महाराष्ट्र राज्य, पुणे

३. संचालक, आय.आय.टी., पवई, मुंबई
४. सहसंचालक, तंत्र शिक्षण विभागीय कार्यालये (सर्व), (संचालक, तंत्र शिक्षण यांच्यामार्फत)
५. सहसंचालक, उच्च शिक्षण, विभागीय कार्यालये (सर्व)
६. उप सचिव (मशि/विशि/अर्थसंकल्प), उच्च व तंत्र शिक्षण विभाग, मंत्रालय, मुंबई
७. निवडनस्ती/तांशि-४